# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची संक्षिप्त माहिती

**उदिष्ट :-** उमेदवारांना उद्योजकांकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करणे.

**आर्थिक तरतुद :-**

- "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरीता रु.५५०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे .

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे स्वरूप:-**

- उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**अंमलबजावणी संस्था :-** कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य.

**योजनेचे ठळक वैशिष्टे :-**

- बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करू शकतील.
- विविध क्षेत्रातील मोठे प्रकल्प,उद्योग/स्टार्टअप्स, विविध आस्थापना इ. यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदवतील.
- सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षणाच्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील.
- सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.
- सदर विद्यावेतन लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात (DBT) जमा करण्यात येईल.

**आस्थापना/उद्योजकासाठी पात्रता**

- आस्थापना / उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा.
- आस्थापना / उद्योजकाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.
- आस्थापना / उद्योगाची स्थापना किमान ३ वर्ष पूर्वीची असावी.
- आस्थापना / उद्योगांनी EPF, ESIC, GST, Certificate of incorporation, DPIT व उद्योग आधारची नोंदणी केलेली असावी.

**उमेदवारांची पात्रता:**

- उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे.
- उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२वी पास/आयटीआय/पदविका/पदवीधर/पदव्युत्तर असावी.
- उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.
- उमेदवाराचे आधार नोंदणी असावी.
- उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.
- उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

**शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विद्यावेतनाचे विवरण खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह विद्यावेतन रु. |
|---|---|---|
| १. | १२ वी पास | रु. ६,०००/- |
| २. | आय.टी.आय/ पदविका | रु. ८,०००/- |
| ३. | पदवीधर /पदव्युत्तर | रु. १०,०००/- |

**संपर्क** – अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अथवा हेल्पलाईन क्रमांक- १८०० १२० ८०४० वर संपर्क साधावा.

**संलग्नक** – कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासनाव्दारे दि. ०९.०७.२०२४ रोजी जारी केलेल शासन निर्णय (संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३)

# Brief note on Mukhyamantri Yuva Karya Prashikshan Yojana

**Objectives:** To enhance candidates' employability through practical training with entrepreneurs.

**Financial Provision:** The Budget provision of Rs. 5500 Cr. for **Mukhyamantri Yuva Karya Prashikshan Yojana** will be made available.

**Implementing Agency:** Commissionerate of Skill Development, Employment, & Entrepreneurship, Maharashtra State.

**Salient Features of the Scheme:**

- $12^{th}$ Pass, ITI, Diploma, Graduate, Post Graduate eligible job seekers can register on the https://rojgar.mahaswayam.gov.in.
- Major industries, Start-ups, Government semi-government establishments can post their vacancies on https://rojgar.mahaswayam.gov.in.
- Around 10 Lakh job training opportunities will be made available in every financial year under this scheme.
- Duration: Job Training will be for 6 months.
- Stipend: Candidates will receive a monthly stipend as per their education qualification in the form of Direct Benefit Transfer (DBT). Following table explains the stipend:

| Sr. No. | Education Qualification | Per Month Stipend in Rs. |
|---|---|---|
| 1 | $12^{th}$ Pass | 6,000/- |
| 2 | ITI / Diploma | 8,000/- |
| 3 | Degree / Post Graduation | 10,000/- |

**Eligibility Criteria:**

**For Candidates:**

- Candidate should be in the age group of 18 to 35.
- Candidate should have minimum education criteria of $12^{th}$ Pass/ITI/Diploma/Graduation/Post Graduation.
- Candidate should be the resident of Maharashtra.
- Candidate should register with Aadhar.
- Candidates' bank account should link with Aadhar.
- Candidate should register on https://rojgar.mahaswayam.gov.in as job seeker.

**For Industries & Establishments:**

- Industries & Establishments should be working in Maharashtra.
- Industries & Establishments should register on the https://rojgar.mahaswayam.gov.in as an employer.
- Industries & Establishments should have established for 3 years.
- Industries & Establishments should register with EPF, ESIC, GST, DPIT & Udyog Aadhar & have certificate of incorporation.

**Contact Information:**

For further details, applicants and establishments can visit nearest District Skill Development, Employment & Entrepreneurship Guidance Center or contact the helpline number 1800 120 8040.

**Enclosure:** Government Resolution issued by the Department of Skills, Employment, Entrepreneurship & Innovation, Government of Maharashtra on 09.07.2024 (संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३).

***********